**ठळक बातम्या**

- हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- उद्योगपती गौतम अदानी यांच्यावरचे लाचखोरीचे आरोप गंभीर असून त्यांना अटक करावी, अशी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी

- ४३ व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याचा आज समारोप

**आणि**

- बंगालच्या उपसागरातल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे श्रीलंकेत मुसळधार पाऊस, १७ जिल्ह्यातल्या दोन लाखांहून अधिक नागरिकांना फटका; तमिळनाडू, आंध्र प्रदेशातही जोरदार पावसाची शक्यता

**<><><><><>**

अदानी उद्योग समूहाच्या लाचखोरी प्रकरण आणि विविध मुद्यांवरून विरोधकांच्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**लोकसभेचं** कामकाज सुरु झाल्यानंतर सभागृहात अदानी प्रकरण तसंच उत्तर प्रदेश आणि मणिपूरमधला हिंसाचार या मुद्द्यांवरून गदारोळ झाला. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना सदनाचं कामकाज चालवण्यासाठी सभागृहाचे शिष्टाचार आणि प्रतिष्ठा राखण्याची वारंवार विनंती केली. प्रश्नोत्तराच्या तासानंतर सर्व मुद्द्यांवर चर्चा केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. मात्र, विरोधकांनी सभागृहाच्या हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू ठेवली. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं

कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी करत आपला विरोध सुरू ठेवला. यामुळे सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**राज्यसभेत**, सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यानंतर अध्यक्ष जगदीप धनखड यांनी अदानी लाचखोरी प्रकरण, तसंच उत्तरप्रदेशातल्या संभल आणि मणिपूर हिंसाचार प्रकरणी विरोधकांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव फेटाळला. धनखड यांनी सदस्यांना चर्चा करून सभागृहाचं कामकाज सुुरु ठेवण्याचं आवाहन केलं. मात्र सभागृहात गोंधळ सुरु राहिल्यानं राज्यसभेचं कामकाज प्रथम साडे अकरा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेत लाचखोरीचे गंभीर आरोप असून त्यांना अटक करावी, अशी मागणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते **राहुल गांधी** यांनी केली आहे. संसदेच्या आवारात ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

इटली इथं भरलेल्या जी सेव्हन देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल सहभाग घेतला होता. हिंद-प्रशांत प्रदेशात नवीन भागीदारी, प्रश्न आणि संघर्ष या प्रमुख घटकांसह अनेक बाबतीत महत्त्वपूर्ण बदल होत आहेत, असं जयशंकर या बैठकीत म्हणाले. या विषयाच्या पार्श्वभूमीवर क्वाड देशांच्या प्रगतीचाही जयशंकर यांनी या बैठकीत उल्लेख केला. सागरी सुरक्षा, सेमी कंडक्टर्स, पुरवठा साखळी आणि कर्ज व्यवहार यांविषयीही जयशंकर यांनी या बैठकीत चर्चा केली.

**<><><><><>**

विकसित भारत २०४७ च्या संकल्पाला जोडूनच बालविवाहमुक्त भारताचं लक्ष्य असल्याचं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी म्हटलं आहे. गेल्या दहा वर्षांत महिला सक्षमीकरणासाठी सरकारनं लिंगभाव समानतेसाठी

जेंडर बजेटसारखी विविध पावलं उचलली आहेत, असं त्या म्हणाल्या. दिल्ली इथं त्यांच्या उपस्थितीत आजपासून देशभरात बालविवाह मुक्त भारत अभियानाची सुरुवात झाली. बालविवाहासारख्या प्रथेचं देशातून समूळ उच्चाटन करणं, हा या अभियानाचा उद्देश आहे. या कार्यक्रमात बालविवाह मुक्त भारत पोर्टलची सुरुवात करण्यात आली. जागरुकता वाढवणं, तसंच बालविवाहासारख्या घटनांची त्वरीत माहिती मिळण्यासाठी या पोर्टलचा उपयोग होणार आहे.

<><><><>

देशातल्या समुद्र किनारी भागातल्या खनिज खाणींच्या लिलावाचा पहिला टप्पा केंद्र सरकारतर्फे उद्या सुरू होणार आहे. या टप्प्यात अरबी समुद्र, अंदमान समुद्रात पसरलेल्या १३ खनिज ठोकळ्यांचा समावेश असेल. हे ठोकळे बांधकामाला उपयुक्त ठरणारी वाळू, चुन्याची माती तसंच मिश्रधातूंच्या खड्ड्यांपासून बनलेले आहेत. या खनिजांचा वापर पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि हरित उर्जा संक्रमण या क्षेत्रांमध्ये होतो.

<><><><>

जम्मू काश्मिरमधल्या रजौरी, पूँछ, किश्तवर आणि उधमपूर जिल्ह्यातल्या जैश ए मोहम्मद आणि लष्कर ए तोएबा या दहशतवादी संघटनांच्या ठिकाणांवर पोलिसांनी काल रात्री छापेमारी केली. यात अनेक संशयितांना अटक करण्यात आली असून इलेक्ट्रॉनिक सामान, कागदपत्र, रोख रक्कम, शस्त्र आदी साहित्य जप्त करण्यात आलं आहे. ही कारवाई सुरू राहणार असल्याचं जम्मू विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक आनंद जैन यांनी सांगितलं. कुठलीही संशयित हालचाल आढळून आल्यास नागरिकांनी याची माहिती पोलिसांना द्यावी, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

<><><><>

झारखंडमधल्या लातेहार जिल्ह्यात काल रात्री नक्षलवाद्यांच्या परस्परातल्या चकमकीत नक्षलवादी कमांडर छोटू खरवार याची हत्या झाली आहे. त्याच्यावर १५ लाखांचं इनाम होतं. पोलिसांनी खरवार याचा मृतदेह ताब्यात घेतला असून पुढील तपास सुरू केला आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तामिळनाडूच्या चार दिवसीय दौऱ्यावर असून या दौऱ्यासाठी त्यांचं कोइम्बतूर विमानतळावर आगमन झालं. त्या उद्या वेलिंग्टन उटी इथल्या संरक्षण सेवा कर्मचारी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर २९ नोव्हेंबर रोजी निलगिरी इथल्या आदिवासींशी संवाद साधणार आहेत. राष्ट्रपतींच्या दौऱ्यासाठी कोइम्बतूर आणि उटी परिसरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

<><><><><>

४३ व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याचा आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं समारोप होणार आहे. विकसित भारत @२०४७ ही या वर्षीच्या व्यापार मेळाव्याची संकल्पना आहे. या वर्षीच्या व्यापार मेळाव्याला जनतेचा उदंड प्रतिसाद मिळाला आहे. चीन, इजिप्त, इराण, दक्षिण कोरिया, थायलंड, तुर्की आणि यूएईसह अकरा देशांनीही या आंतरराष्ट्रीय मेळाव्यात भाग घेतला. यावर्षी झारखंड हे मुख्य आकर्षण असलेले राज्य होते तर बिहार आणि उत्तर प्रदेश हे भागीदार राज्य होते.

<><><><><>

बंगालच्या उपसागरावर नैर्ऋत्य भागात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा गेल्या सहा तासात ताशी १३ किलोमीटर वेगाने उत्तरेकडे सरकला आहे. हे ठिकाण त्रिनकोमाली, नागपट्टीनम आणि चेन्नई या भागांपासून जवळ आहे. कमी दाबाचा

पट्टा पुढच्या १२ तासात उत्तर-वायव्य भागाकडे सरकून त्याचं रुपांतर चक्रिवादळात होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

<><><><><>

फेंगल चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूच्या किनारी भागाला मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. तसंच आंध्र प्रदेशाच्या किनारपट्टीवरही मुसळधार पावसाची शक्यता आहे. मच्छिमारांनी पुढचे तीन दिवस बंगालच्या उपसागरात, तामिळनाडूच्या किनाऱ्यावर आणि दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर न जाण्याचा सल्ला हवामान विभागानं दिला आहे.

<><><><><>

बंगालच्या नैर्ऋत्य भागात तयार झालेला खोल दाबाच्या पट्ट्याचं चक्रीवादळात रुपांतर होण्याच्या शक्यतेमुळे श्रीलंकन नौदल आणि मासेमारी करणाऱ्यांनी त्रिनकोमालीच्या समुद्री भागात जाऊ नये, असा इशारा श्रीलंकेच्या हवामान विभागाने दिला आहे. या चक्रीवादळा दरम्यान झालेल्या पावसामुळे श्रीलंकेच्या १७ जिल्ह्यांमधल्या २ लाखांहून अधिक नागरिकांना फटका बसला आहे. १० हजारांहून अधिक जणांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. आपत्कालीन मदतीसाठी लष्कर आणि नौदलाची पथकं तैनात करण्यात आली आहेत.

<><><><><>

पाकिस्तानच्या सुरक्षा दलांनी पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान यांच्या समर्थकांवर धाडसत्र सुरु केलं आहे. तुरुंगवासात असलेल्या इम्रानखान यांच्या सुटकेची मागणी करत त्यांच्या समर्थकांनी इस्लामाबादमध्ये निदर्शनं केली. निदर्शकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी त्या भागातली वीज घालवून त्यांच्यावर

अश्रुधुराचा मारा केला. इस्लामाबादमध्ये सरकारी कार्यालयं असलेल्या संवेदनशील भागात काल  इम्रान खान यांची पत्नी बुशरा बिबी यांच्या नेतृत्वाखाली हजारो निदर्शक जमले होते. त्यावेळी सुरक्षादलांच्या कारवाईत निदर्शनांना हिंसक वळण लागून सहा जण ठार तर बारा जण जखमी झाले.

**<><><><><>**

इस्त्रायलनं लेबनॉनसह इतर भागात ६० दिवस युध्दविरामाची घोषणा केली आहे. अमेरिकेनं मध्यस्थी केल्यानंतर ही योजना आखण्यात आल्याचं इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी सांगितलं. युध्दविरामा संदर्भात इस्त्रायलच्या मंत्रीमंडळात प्रस्ताव सादर केला गेला आहे. इस्त्रायली सैन्य आणि हिजबुल्ला दरम्यान ६० दिवसांचा हा युध्दविराम असेल. लेबनॉनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी या कराराला आधीच पाठिंबा दर्शवला आहे. मात्र हिजबुल्लाहनं कराराचं उल्लंघन केल्यास त्वरित प्रत्युत्तर दिलं जाईल, असा इशाराही नेतन्याहू यांनी दिला आहे.

**<><><><><>**

५५ वा भारतीय  आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फि चा उद्या समारोप होत असून आज आदल्या दिवशी सुमारे ७० चित्रपट दाखवले जाणार आहेत. यात तपन सिन्हा यांच्या हार्मोनियम या चित्रपटाचाही  समावेश आहे. तपन सिन्हा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सिनेमातून गोष्ट सांगण्याच्या त्यांच्या अनोख्या शैलीवर अर्जुन चक्रवर्ती, एन मनू चक्रवर्ती आणि जेष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोर आपली मतं मांडणार आहेत. राज कपूर, मोहम्मद रफी, तपन सिन्हा आणि अक्किनेरी नागेश्वर राव या भारतीय चित्रपट व्यवसायातल्या दिग्गजांवर यंदाच्या या महोत्सवात विशेष कार्यक्रम करण्यात आले.

**//<><><><><>//**